महाराष्ट्र टाईम्स, कोल्हापूर
9-10-2015

# शून्य कचरानिर्मित शहरे शक्य

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



दुर्मिळ 'सीतेचा-अशोक' या वृक्षाच्या रोपाला खतपाणी घालून महोत्सवाचे उद्घाटन करताना कृष्णा गावडे, प्रकाश राव, आर. आर. देशपांडे, दिलीप बोराळकर, चंद्रकांत जोशी, दिलीप बापट आणि राहूल पवार.

घनकचऱ्याविषयीची सध्याची व्यवस्था चुकीची आहे. शहरातील कचरा गोळा करून तो शहराबाहेर टाकण्याऐवजी ज्या त्या ठिकाणीच कचऱ्याची विल्हेवाट लावता येऊ शकते. ही योजना आमलात आल्यास शून्य कचरानिर्मित शहरे बनवणे शक्य असल्याचे मत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे निवृत्त सदस्य सचिव डॉ. दिलीप बोराळकर यांनी व्यक्त केले. किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कलामहर्षि बाबुराव पेंटर फिल्म सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहाव्या वसुंधरा महोत्सवाचे उद्घाटन बोराळकर यांच्या हस्ते झाले. किर्लोस्कर ऑइल इंजिन्सचे व्यवस्थापकीय सहसंचालक आर. आर. देशपांडे अध्यक्षस्थानी होते. कोल्हापूरबरोबरच मीरा-भाईंदर, कल्याण-डोबिंवली, मुंबई, पुणे आदी महानगरपालिकांमध्ये कचऱ्याच्या प्रश्न गंभीर होत आहे. शहरातील कचरा वर्गीकरण केल्यानंतर शहराबाहेर नेऊन टाकणे हा घनकचरा व्यवस्थापनाचा पर्याय होऊ शकत नाही.

बाबुराव पेंटर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत जोशी यांनी प्रास्ताविक केले. समीर देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. राहुल पवार यांनी आभार मानले. या वेळी कृष्णा गावडे, प्रकाश राव, दिलीप बापट आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर फिश हा माहितीपट दाखवण्यात आला. गुरुवारी वसुंधरा महोत्सवाअंतर्गत छायाचित्र, चित्र व टाकाऊपासून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शनही खुले करण्यात आले.